# भारतीय राज्यघटनेतील समान नागरी कायदा-एक चिकित्सा

भारतीय राज्यकर्त्यांनी न्यायालयकक्षाबाह्य अशा मार्गदर्शक तत्त्वातील ४४ व्या कलमानुसार राज्याने सर्व भारतीयांसाठी समान नागरी कायदा आणण्याचा प्रयत्न करावा असा आदेश दिलेला आहे. शासनकर्ते हे उत्तरदायित्व पूर्ण करू शकले नाहीत. एवढेच नव्हे तर या कालखंडात आदेशाचे विस्मरणच झालेले दिसते. अलीकडेच बेगम शहाबानो प्रकरणानंतर उठलेले वादळ, पुरोगामी-प्रतिगामी संघर्ष, मुस्लिम अपरिवर्तनवाद्यांची लढण्याची घोषणा, समान नागरी कायदा नको असेल त्यांनी "भारतातून चालते व्हावे" ही प्रतिघोषणा, घटनासमितीत मुस्लिम नेत्यांनी नागरी कायद्याबाबतीत कोणती भूमिका घेतली याबाबतीत संदेह, धर्मस्वातंत्र्याचा समावेश घटनाकर्त्यांनी न्यायालयकक्षांतर्गत अशा मूलभूत हक्कात केला, समता व धर्मनिरपेक्षता यांना पोषक असा समान नागरी कायदा मात्र न्यायालयकक्षाबाह्य अशा मार्गदर्शक तत्त्वांत का समाविष्ट केला या बाबतीत वैचारिक व व्यावहारिक मतभेद, या सर्व पार्श्वभूमीवर घटना समितीमध्ये ४४ व्या कलमाच्यावेळी प्रत्यक्ष काय घडले, भारताला खऱ्या अर्थाने सेक्यूलर राष्ट्र व्हावयाचे असेल तर हा कायदा त्वरित अमलात आणणे का आवश्यक आहे याचा विचार करणे उद्बोधक ठरेल.

अ

मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने घटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर यांनी मसुदा घटना समितीला सादर केला. मसुद्यावर कलमवार चर्चा सुरू असताना समान नागरी कायद्याचा उल्लेख असलेल्या कलम ३५ ला (आजच्या घटनेतील कलम ४४) प्रखर विरोध ज्याप्रमाणे झाला त्याचप्रमाणे या कायद्याची आवश्यकताही प्रतिपादिली गेली. तीव्र विरोध झाला तो फक्त मौलाना हसरत मोहनी यांचा. त्यांच्या मते विवाह, घटस्फोट, वारसा इ. बाबतचे मुस्लिम कायदे अपौरुषेय

अशा कुराणातून आलेले आहेत. व्यक्तिगत कायद्यातील हस्तक्षेप मुस्लिम जनता कधीही सहन करणार नाही. हस्तक्षेप करण्याचा कोणी प्रयत्न केलाच तर त्यांना मुसलमानांच्या कडव्या विरोधाला व गंभीर परिणामाला तोंड द्यावे लागेल असा इशाराही मोहनीसाहेबानी दिला. त्यांचे उद्गार होते –

Musalmans' will never submit to any interference in their personal law and they will have to face an iron wall of Muslim determination to oppose them in every way [१]

अर्थात घटना समितीतील सर्वच मुस्लिम नेते सनातनी, परंपरानिष्ठ व व्यक्तिगत कायदे अपौरुषेय मानणारे होते असे नव्हे. त्यांचा समान नागरी कायद्याला काहीच विरोध नव्हता. विरोध होता तो गडबडीने असा कायदा अमलात आणण्याला. मुस्लिम समाजातील सुधारणेला ज्यांची मते अनुकूल होती अशा महमद इस्माइलसाहेब, श्री. नझीरुद्दीन अहमद आदि नेत्यांची भूमिका या प्रकारची होती. महमद इस्माइलसाहेबांच्या मते व्यक्तिगत कायदा हा त्या त्या धर्मातील लोकांच्या जीवनातील अविभाज्य घटक असतो. त्यात हस्तक्षेप म्हणजे परंपरागत आचारात आणलेला अडसर ठरेल. म्हणून व्यक्तिगत कायद्यात ढवळाढवळ नको. नाझिरुद्दिन अहमद यानी असे दाखवून दिले की समान नागरी कायद्यासंबंधीचे कलम १९ ला (आजचे कलम २५, धार्मिक स्वातंत्र्याबाबत) छेद देणारे आहे. मात्र त्यांनी पुढे असे प्रतिपादिले की समान नागरी कायदा तर अमलात आलाच पाहिजे, फक्त त्याची अमलबजावणी,सावधपणे, संयमाने, धीमेपणाने, मुत्सद्देगिरीने झाली पाहिजे. जनतेच्या मनाचा कानोसा घेऊन, जनतेला विश्वासात घेऊन, अनुकूल मत तयार करून हा कायदा संमत केला पाहिजे. ते म्हणाले.

"...the goal should be towards a uniform civil code, but it should be gradual and with the consent of the people concerned ...We should proceed not in haste, but with caution, with experience, with statesmanship and with sympathy."[२]

मुस्लिम सदस्यांच्या समान नागरी कायद्याच्या विरोधाला चोख उत्तरही घटनासमितीत देण्यात आले. काही सदस्यांनी असे दर्शविले की अनेक क्षेत्रांत समान नागरी कायदा अस्तित्वात आलेलाच आहे. व्यक्तिगत कायद्यात विविधता असली तरी त्यांच्या बाबतीत पवित्र, स्पर्शातीत असे काहीही नाही विवाह, घटस्फोट, पोटगी, वारसा यासारखे सामाजिक प्रश्न धर्मशास्त्रापासून अलग केले पाहिजेत. सर्व नागरिकांना एकसमयावच्छेदेकरून लागू होणाऱ्या कायद्यांमुळे राष्ट्रीय ऐक्य वृद्धिगत होण्यास मदत होईल असा युक्तिवादही सदस्यांनी केला.

हे खरे आहे की कलम २५ ते २८ मध्ये "धर्मस्वातंत्र्याचा अधिकार" या शीर्षकाखाली काही हक्कांचा उल्लेख आहे. नागरिकांना सदसद्‌विवेक बुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्तपणे प्रतिज्ञापन, आचरण व प्रसार करण्याचे स्वातंत्र्य आहे. अर्थात काही निर्बंध यावर आहेतच. परंतु या चारही कलमांत कुठेही धर्मनिरपेक्ष अशा सामाजिक गोष्टींचा समावेश नाही. धर्माचरणाच्या स्वातंत्र्याच्या हमीमधून धर्मनिरपेक्ष अशा सामाजिक संबंधातल्या गोष्टी वर्ज्य करण्यात आलेल्या आहेत. कलम २५ (२) (अ) आणि (ब) मध्ये स्पष्ट म्हटले आहे की धार्मिक आचरणाशी निगडित असणाऱ्या कोणत्याही आर्थिक, वित्तविषयक, राजकीय अथवा अन्य लौकिक व्यवहाराचे नियमन अथवा नियंत्रण करण्याचा तसेच सामाजिक सुखसोयी किंवा सुधारणा किंवा हिंदुधर्मातील सर्व वर्गांना आणि जातींना सार्वजनिक स्वरूपाच्या धार्मिक संस्था खुल्या ठेवणे याबाबत कायदे वा उपाययोजना करण्याचा शासनाचा अधिकार या कलमाने प्रतिबंधित होणार नाही. याविरुद्ध व्यक्तिगत कायदे हे लौकिक व्यवहाराशी निगडित (Secular activities) असल्याने राज्याच्या नियंत्रणाच्या अधिकारात मोडतात असे अनुमान करता येईल.

याला पुरावा घटनासमितीतील चर्चेतही आढळतो. कलम १९ मध्ये (आजच्या घटनेतील कलम २५) धर्मविषयक हक्क बहाल केलेले असले तरी त्यामुळे एक धर्मनिरपेक्ष सामाजिक सुधारणा म्हणून समान नागरी कायदा संमत करण्यात संसदेला कोणतीच अडचण येणार नाही ही बाब श्री. के एम. मुन्शी यांनी पटवून दिली समान नागरी कायदा अल्पसंख्याकांवर प्रचंड अन्याय करणारा आहे या आरोपाचे खंडन करीत असताना श्री. मुन्शी यांनी सभागृहाला साधार लक्षात आणून दिले की कोणत्याही प्रगत मुस्लिम राष्ट्रांमध्ये व्यक्तिगत कायदे पवित्र मानून स्वायत्त ठेवलेले नाहीत तुर्कस्तान व इजिप्त यांचा दाखला त्यांनी दिला. समान नागरी कायद्याचे महत्त्व स्पष्ट करताना श्री. मुन्शी म्हणाले:

"...After all we are advancing society. We are in a stage where we must unify and consolidate the nation by every means without interfering with religious practices. If, however, the religious practices in the past have been so construed asto cover the whole field of life, we have reached a point when we must put our foot down and say that these matters are not religious, they are purely matters for secular legislation. This is emphasised by this article..."[1]

विवाह, घटस्फोट, वारसा इ. मानवी संबंधातील व्यवहाराबाबत एकवाक्यता आणणे हेच ३५ व्या कलमामागील (समान नागरी कायद्याचे कलम) प्रयोजन आहे, हे श्री. अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांनी स्पष्ट केले॰ श्री. हुसेन इमाम यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देत असताना मानवी संबंधातील बहुतेक प्रत्येक क्षेत्रात समान नागरी कायदा अस्तित्वात आलेलाच आहे, केवळ विवाह, घटस्फोट, व वारसा यांनाच स्पर्श झालेला नाही, या उर्वरित भागासाठीच ३५ व्या कलमाचा समावेश घटनेत केलेला आहे असे डॉ आंबेडकरांनी सांगितले असे त्यांचे प्रतिपादन होते.

"The argument whether we should attempt such a thing seems to be somewhat misplaced for simple reason that we have, as a matter of fact, covering the whole lot of the field which is covered by a Uniform Civil Code in this country. It is, therefore, too late now to ask the question whether we could do it. As I say, we have alreday done it"

काही विरोधक वगळता घटना समितीतील एकूण चर्चेचा सूर असा होता की जेव्हा परिस्थिती अनुकूल होईल आणि संसदेतील बहुसंख्य सदस्यांना योग्य वाटेल त्यावेळी समान नागरी कायदा अमलात आला पाहिजे

**ब**

घटना अस्तित्वात येऊन ४० वर्षे लोटली. ४२ व्या घटना दुरुस्तीनंतर (इ. स. १९७६) घटनेच्या प्रास्ताविकामध्ये 'सेक्यूलर' हे तत्त्व समाविष्ट झाल्यानंतरही आजपर्यंत हा कायदा अमलात येऊ शकला नाही हा घटनाकर्त्यांचा अपेक्षाभंगच आहे असे म्हणावे लागेल. दिवसेंदिवस परिस्थिती प्रतिकूलच होत चालली आहे. समान नागरी कायद्याच्या दिशेने वाटचाल या दृष्टीने १९८५ मध्ये महमद अहमद खान विरुद्ध शाहबानो बेगम खटल्यात 'इद्दतच्या' कालखंडानंतर घटस्फोटित महिलेला तिच्या मुस्लिम पतीने पोटगी दिली पाहिजे' असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिलेला होता. कलम ४४ हे एक 'निःसत्त्व तत्त्व' (dead letter) झाले आहे म्हणून न्यायालयाने खेदही प्रकट केला. समान नागरी कायद्याच्या आवश्यकतेवर भर देत असताना सन्माननीय न्यायमूर्ती म्हणतात:

"A common civil code will help the cause of national integration by removing disparate loyalties to laws which have

conflicting ideologies...a beginning has to be made if the Constitution is to have any meaning."[१]

१९८५ मधीलच मेसर्स जॉर्डन डेंगडे विरुद्ध एस. एस् चोप्रा खटल्यातही सर्वोच्च न्यायालयाने धर्म-जात समान नागरी कायद्याची आवश्यकता प्रतिपादिली होती. या बाबतीत पुढाकार घेण्याचे आवाहन विधिमंडळाला केले होते. पण सर्वोच्च न्यायालयाचा निर्णयच आमच्या शासनकर्त्यांनी निष्फळ ठरवून सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनाच नव्हे तर घटनाकर्त्यांनाही मान खाली घालण्यास लावले. सर्वोच्च न्यायालयांच्या निर्णयानंतर मुस्लिमांचा विरोध तीव्र झाला. त्याची प्रतिक्रिया संविधानालाच आव्हान देणारी होती. त्यांच्यासमोर केंद्र सरकारने शरणागती पत्करून १९८६ मध्ये " मुस्लिम स्त्रिया, तलाक अधिकाराचे संरक्षण " हे विधेयक मंजूर केले. तलाकाबरोबरच स्त्रीला मेहेर व इद्दतचा पैसा मिळाला नसल्यास तो मिळवून देणे, ती निर्धन असल्यास तिच्या माहेरच्या नातलगांकडून तिला पोटगी देववणे, असे नातलग नसल्यास अगर पोटगी देण्यास ते समर्थ नसल्यास वक्फ बोर्डाकडून ती मिळवून देणे हे उद्दिष्ट असलेल्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले आणि समान नागरी कायद्याला तिलांजली मिळाली.

घटनाकर्त्यांनी मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीची ज्याच्यावर जबाबदारी सोपविली आहे व मार्गदर्शक तत्त्वे कृतीत आणण्याचे कर्तव्य ज्यांना पार पाडावयाचे आहे त्या शासनसंस्थेनेच मार्गदर्शक तत्त्वाच्या विरुद्ध निर्णय घेण्यास प्रारंभ केला तर कुंपणच शेत खाल्ल्यासारखे अगर संरक्षकच भक्षक ठरल्यासारखे होणार आहे. अशा परिस्थितीत भारतीय समाजात सुधारणेला आशाच रहाणार नाही. समताधिष्ठित समाज रचनेला वाव मिळणार नाही. म्हणूनच समाज सुधारणेची गरज स्पष्ट करताना डॉ आंबेडकर इशारा देतात की मानवी संबंधातसुद्धा आपआपल्या धर्मशास्त्रानुसार वागण्याची मुभा नागरिकांना दिली गेली तर हा देश सामाजिक सुधारणेच्या बाबतीत गतिशील न राहाता स्थितिशील होईल. धर्माच्या मूलभूत तत्त्वांना स्पर्श करू नये हे जरी बरोबर असले तरी तथाकथित धार्मिक तत्त्वे सामाजिक सुधारणेत अडसर ठरत असतील तर अशा तत्त्वांची गयही करता कामा नये. ही बाब लक्षात घेऊनच जनतेचा तीव्र विरोध होत असतानासुद्धा त्यांनी संसदेमध्ये सदस्यांना पटवून देऊन सर्वंकष स्वरूपाचे हिंदू कोड बिल मंजूर करून घेण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम म्हणजे १९५५ मध्ये हिंदू कायद्याचे खऱ्या अर्थाने संहितीकरण व निधर्मीकरण झाले. त्यावेळचे कायदामंत्री श्री. दादासाहेब पाटसकर यांनी मूळ हिंदू कोड बिलाचे चार भाग केले, हे चार भाग कायदे म्हणून संसदेने १९५५-५६ मध्ये संमत केले. तेव्हा परंपरानिष्ठ, प्रतिगामी, सनातनी

अशा काही मुस्लिम बांधवांकडून विरोध होतो म्हणून समान नागरी कायद्याचे तत्त्व किती काळ आपण लांबणीवर टाकणार आहोत याचा विचार होणे राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने आवश्यक झालेले आहे. भारतीय राष्ट्रवाद हा धर्मनिरपेक्षता तत्त्वाशी निगडित आहे. समान नागरी कायदा धर्मनिरपेक्षतेचा प्राण आहे. म्हणून समान नागरिकत्वाची कल्पना भारतीय राष्ट्रवादाला जिव्हाळ्याची व पायाभूत आहे. हिंदू कोड बिलाच्याद्वारे धर्मनिरपेक्षतेच्या व समान नागरी कायद्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. १९५४ मध्ये विशेष विवाह कायदा अमलात आला. या कायद्यानुसार काही सुधारणा झाल्या. सर्व धर्मांच्या स्त्री-पुरुषांना धर्मांतर न करता एकमेकांशी विवाह करता येतो. त्यांची संतती औरस मानली जाते. मुस्लिम पति पत्नींना या कायद्याखाली नाव नोंदवून 'सिव्हिल मॅरेज' मध्ये आपला विवाह रूपांतरित करता येतो व त्यांना इंडियन सक्सेशन ॲक्ट हा वारसाविषयक कायदा लागू होतो. अशा विवाहात एकपती-एकपत्नी अध्याहृत आहे आणि तलाक पद्धतीने घटस्फोट देता येत नाही.

सनातनी मुस्लिमांनी या कायद्यालाही विरोध केला. विशेष विवाह कायदा म्हणजे देशात समान नागरी कायदा आणण्याचा प्रारंभ आहे. तो आम्ही सहन करणार नाही असा इशारा मुस्लिम लीगने १९५५ मध्ये दिला. शरियत हा आमचे जिव्हाळ्याचा अंश असून तिच्या जागी दुसरा कायदा जारी करणे हे भारतीय घटनेनेच दिलेल्या धर्मस्वातंत्र्याच्या विरुद्ध आहे याची जाणीव मुस्लिम लीगने करून दिली व या कायद्यानुसार विवाह नोंदविण्याची मोकळीक कोणाही मुसलमानाला असू नये अशी सूचना केली ? ती मान्य करण्यात आली नाही हा भाग निराळा. पण कोणत्याही सामाजिक सुधारणेला सनातनी मुस्लिमांचा विरोध होतो हे मात्र स्पष्ट झाले. अर्थात मुसलमान समाजातही प्रागतिक विचाराचे सुधारणावादी मुस्लिम नेते व अनुयायी होते व आहेत हे अमान्य करता येणार नाही. न्या. छगला, प्रा. हबीब, हमीद दलवाई, डॉ. ग्झिवी या सारखे मान्यवर भारतातील इस्लामच्या पुरोगामी वर्गाचे प्रतिनिधी आहेत. ते आपल्या परीने परिवर्तनाच्या दिशेने प्रयत्न करीत आलेले आहेत. आधुनिक उदारमतवाद व समतेची कल्पना आपल्या लेखणी व कृतीद्वारे मुस्लिम समाजात आणण्याचा प्रयत्न सुधारक करीत आहेत. डॉ. ताहीर मेहमूद यानी आपल्या मुस्लिम पर्सनल लॉ (१९७७) या पुस्तकामध्ये सर्व भारतीयांसाठी समान नागरी कायद्याचे जोरदार समर्थन केले आहे. धर्मनिरपेक्षतेचे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी धर्माधिष्ठित व्यक्तिगत कायद्याचा त्याग शासनाने त्वरित केला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. पुरोगामी, सुधारणावादी मुस्लिम नेत्यांना प्रतिसाद मिळण्यासाठी इतरांची साथ व कायद्याचे पाठबळ असणे आवश्यक आहे.

पण इथे मात्र चित्र उलटे दिसते. समान नागरी कायदा आणण्याच्या दृष्टीने गेल्या ४० वर्षांत राज्याने खास असे काही प्रयत्नच केलेले नाहीत. उलट न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधी भूमिका संसदेने घेतलेली दिसते. वस्तुतः न्यायमंडळ आणि विधिमंडळ हे दोन्ही भारतातील सर्वोच्च पातळीवरील श्रेष्ठ संस्था आहेत. स्वतंत्र भारतात स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता यावर अधिष्ठित अशी जी समाजरचना निर्माण करावयाची आहे त्यासाठी जे सामाजिक अभियांत्रिकीकरण करावे लागणार आहे त्याची पूर्ण जाण व परस्पर सहकार्य, वैचारिक देवघेव या दोन संस्थांमध्ये होणे आवश्यक आहे. पण याचा नेमका अभाव गेल्या ४० वर्षांत दिसून आलेला आहे. मार्गदर्शक तत्त्वांच्या कार्यवाहीसाठी संसदेने काही कायदे संमत केले की मूलभूत हक्कांची पायमल्ली होते म्हणून नागरिकांनी न्यायालयाकडे धाव घेणे, नंतर न्यायालयाने शासनाविरुद्ध निर्णय द्यावयाचे, यातून मार्ग काढण्यासाठी संसदेने घटना दुरुस्ती करावयाची, दुरुस्तीविरुद्ध पुन्हा न्याययंत्रणेने निर्णय द्यावयाचे, पुन्हा संसदेने घटना दुरुस्ती करावयाची अशारीतीने न्यायालय व संसद यांच्यात स्वातंत्र्योत्तर काळात रस्सीखेच सुरू झाली. त्यातून विधिमंडळ श्रेष्ठ की न्यायमंडळ श्रेष्ठ असे वादही निर्माण झाले. या सगळ्यांचा आढावा घेणे या ठिकाणी शक्य असले तरी प्रस्तुत संदर्भात आवश्यक नाही. परंतु या दोन संस्थांमध्ये जो संघर्ष सुरू झाला त्याचे विपरित परिणाम समताधिष्ठित समाजरचनेच्या प्रयत्नावर झालेले आहेत हे नाकारता येत नाही. बेगम शहाबानो प्रकारणात न्याययंत्रणेने दिलेल्या निर्णयाविरुद्ध विधेयक संमत करण्याची संसदेला आवश्यकता नव्हती पण संसदेने तसे केले हे मात्र निर्विवाद म्हणूनच संसदेने संमत केलेल्या कायद्याविरुद्ध प्रतिक्रिया व्यक्त करताना "मुस्लिम महिलांचा पोटगीचा कायदा ही घटनेची कुचेष्टा असून लोकसभेने घटनेवर आक्रमणच केलेले आहे अशी टीका माजी सरन्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड यांनी केली"[१०] याचा अर्थ न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरूद्ध व्यापक जनहितासाठी संसदेने घटनादुरुस्ती करू नये अगर कायदे संमत करू नयेत, किंवा संसदेने संमत केलेल्या कायद्याविरुद्ध निर्णय सर्वोच्च न्यायालयाने देऊ नये असे नाही. मात्र असे करीत असताना घटनेमध्ये काय सांगितले आहे, घटनाकर्त्यांच्या मनात काय दडलेले आहे याचा शोधही या दोन्ही संस्थांनी घेणे आवश्यक आहे. अन्यथा सामाजिक-आर्थिक-राजकीय न्यायाचा ओघ वाहात असलेला समताधिष्ठित समाज भारतात निर्माण करण्याच्या उद्दिष्टाप्रत आपण पोहोचू शकणार नाही.

समान नागरी कायदा ही काळाची गरज आहे हे ओळखूनच घटनाकर्त्यांनी घटनेतच त्याचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. किंबहुना हा उल्लेख असल्यामुळेच सुरुवातीच्या कालखंडात म्हणजेच ४२ वी घटना दुरुस्ती होईपर्यंत घटनेमध्ये

'सेक्युलर' हा शब्दही आणण्याची गरज भासलेली नव्हती. आता घटनेमध्ये 'सेक्युलर' व 'युनिफॉर्म सिव्हिल कोड' या दोहोंचाही समावेश आहे. म्हणूनच समान नागरी कायदा आणण्यासाठी सर्व स्तरांवरून प्रयत्न करणे आवश्यक आहे. याला खरा विरोध मुस्लिमांचा आहे. तेव्हा भारताने असे दाखवून दिले पाहिजे की भारत हे इस्लाम विरोधी–दार अल हर्ब–राष्ट्र नाही, तसेच ते इस्लामी– दार अल इस्लाम– राष्ट्रही नाही घटनेच्या ध्येयधोरणानुसार कायदे करणारे हे एक तटस्थ राष्ट्र–दार अल हियाद–आहे. प्रगत समाजात धर्म व व्यक्तिगत कायदे यांच्यात अनिवार्य संबंध नसतो हे समान नागरी कायद्यामागील गृहीततत्त्व मुस्लिमांना समजावून सांगणे आवश्यक आहे. तुर्कस्तान व इजिप्तसारख्या मुस्लिम देशांत सुद्धा समान नागरी कायदा कार्यवाहीत आहे ही बाब लक्षात आणून दिली गेली पाहिजे. जर समान नागरी कायदा अमलात आला नाही तर विषमतेवर आधारित अशी चातुर्वर्ण्य व्यवस्था भारतीयानी त्याज्य ठरविली पण एका नव्या रूपात चातुर्वर्ण्य व्यवस्था- हिंदु, मुस्लिम, ख्रिश्चन व पारशी धर्मांवर अधिष्ठित– त्यांनी स्वीकारली असे होईल. 'सेक्यूलर' हा शब्द केवळ एक सत्त्वहीन संकल्पना बनेल.

विद्यावर्धिनी कॉलेज, धुळे बी. आर. जोशी

संदर्भ

१. घटना समिती चर्चाग्रंथ खंड ७, पान नं. ७५९
२. तत्रैव पान नं. ५४२
३. तत्रैव पान नं. ५४७
४. तत्रैव ५४७
५ तत्रैव पान नं. ५५०
६. एम पी जैन, 'इंडियन कॉन्स्टिटयूशनल लॉ' पान नं. ७४६
७ तत्रैव पान नं. ७४६
८. घटना समिती चर्चाग्रंथ, खंड ७ पान नं. ७८१
९. करंदिकर एम. ए., "आधुनिक भारत आणि इस्लाम" पान नं. १६६
१०. दैनिक 'महाराष्ट्र टाईम्स,' मुंबई, २४–१–८९

(टीप- हा लेख लेखकाने अहमदनगर अधिवेशनात (फेब्रुवारी–मार्च १९९२) सादर केला होता. पण 'परामर्श'च्या अहमदनगर अधिवेशन विशेषांकात (फेब्रुवारी १९९३) तो प्रसिद्ध करता आला नव्हता. तो या अंकात प्रसिद्ध केला आहे.– का. संपादक)